# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## पादचारी दिन (वॉकिंग प्लाझा) निमित्त दि. ११/१२/२०२४ रोजी लक्ष्मी रोडवरून संचलनात असणाऱ्या पीएमपीएमएल बसेसच्या मार्गांतील बदलाबाबत

पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ११/१२/२०२४ रोजी पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रोडवर (उंबऱ्या गणपती चौक ते गरूड गणपती चौक) वॉकिंग प्लाझा या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याने लक्ष्मी रोडवरून संचलनात असलेल्या बसेसच्या मार्गात दिनांक ११/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१) बसमार्ग क्र. ५५, ५८, ५९ हे बस मार्ग शनिपारकडे येताना कुमठेकर रोड मार्गे नियमित मार्गाने व शनिपारकडून जाताना अ.ब.चौक, नारायण पेठ, अलका टॉकिज चौकातुन पुढे नियमित मार्गाने संचलनात राहतील.

२) बसमार्ग क्र. ५७ या मार्गावरील बसेस पुणे स्टेशनकडून जाताना बसमार्ग क्र. ९४ च्या मार्गाने नारायणपेठ मार्गे अलका टॉकिज चौक व पुढे नियमित मार्गाने संचलनात राहतील.

३) अटल पुण्यदशमचे बसमार्ग क्र. ७ व ९ तसेच बसमार्ग क्र. ८१, १४४, १४४अ, १४४क व २८३ या मार्गावरील बसेस पुणे स्टेशनकडे जाताना नियमित मार्गाने संचलनात राहतील. तसेच पुणे स्टेशनकडून येताना बसमार्ग क्र. ९४ च्या मार्गाने नारायणपेठ मार्गे अलका टॉकिज चौक व पुढे नियमित मार्गाने संचलनात राहतील.

४) बसमार्ग क्र. १७४ या मार्गावरील बसेस पुणे स्टेशनकडून एनडीए कडे जाताना सिटी पोस्ट पर्यंत नियमित मार्गाने व पुढे उजवीकडे वळून अ.ब.चौक च्या पुढे बसमार्ग क्र. ९४ च्या मार्गाने नारायणपेठ मार्गे अलका टॉकिज चौक व पुढे नियमित मार्गाने संचलनात राहतील. तसेच एनडीए कडून पुणे स्टेशनकडे येताना सदर मार्गावरील बसेस नियमित मार्गाने संचलनात राहतील.

५) बसमार्ग क्र. १९७ व २०२ या मार्गावरील बसेस हडपसरकडून कोथरूड डेपो/वारजे माळवाडीकडे जाताना सिटी पोस्ट पर्यंत नियमित मार्गाने व पुढे उजवीकडे वळून अ.ब.चौक च्या पुढे बसमार्ग क्र. ९४ च्या मार्गाने नारायणपेठ मार्गे अलका टॉकिज चौक व पुढे नियमित मार्गाने संचलनात राहतील. तसेच कोथरूड डेपो/वारजे माळवाडी कडून हडपसरकडे येताना सदर मार्गावरील बसेस नियमित मार्गाने संचलनात राहतील.

६) बसमार्ग क्र. ६८ या मार्गावरील बसेस अप्पर डेपो कडे जाताना नियमित मार्गाने व अप्पर डेपो कडून सुतारदरा कडे येताना टिळकरोड मार्गे संचलनात राहतील.

सदर दिवशी वॉकिंग प्लाझा या उपक्रमाची सांगता झालेनंतर वरील सर्व मार्गावरील बसेस पूर्ववत मार्गाने संचलनात राहतील.

Sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

दि. ०९/१२/२०२४

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---